**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १७३/२०२१ निशाणी ३७ चे अर्जावरील आदेश</u>**

(अशोक निवृत्ती आरवरे (पाटील) विाा श्रीमती आशा वसंत आरवरे (पाटील) वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुद्ध झालेला कैफियत नाही हा आदेश रद्द होवून मिळणेसाठी केलेले आहे.

२. प्रतिवादी यांचे कथनानुसार, प्रतिवादी ही महिला असून सदरील प्रतिवादी यांना कायद्याचे ज्ञान नसलेमुळे सदरील केस संदर्भातील कागदपत्रे काढणेस सांगितले होते, ते त्यांना वेळेत मिळाले नसलेमुळे वकिलांना भेटून केस संदर्भात माहिती देता आली नाही. त्यामुळे कैफियत मुदतीत तयार करता आली नाही आणि कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. तरी कैफियत नाहीचा झालेला आदेश सेट असाईड होवून कैफियत रेकॉर्डवर दाखल करुन घेण्यात यावी. सदरचा आदेश रद्द न झालेस प्रतिवादी यांचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. तसेच दाव्याचा निकाल गुणावगुणावर लागण्यासाठी योग्य व न्यायाचे होणार आहे. सबब प्रतिवादीविरुध्द झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द करुन प्रतिवादींची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी, अशी विनंती केली.

३. वादी यांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून अर्जास हरकत नोंदविली आहे. प्रतिवादी क्र.१ ची अर्जात नमुद मजकुर व मागणी चुकीची आहे. तसेच कैफियत देणेस उशिर झालेचे त्यांना मान्य नाही. सदर प्रतिवादी क्र.१ यांना दि.१३.११.२०२१ रोजी दावा समन्स मिळूनही त्यानंतर कायदेशिर मुदतीत कैफियत दिली नाही व सुमारे पाच महिन्याचे विलंबाने कैफियत देत असून त्यातील विलंब माफीस दिलेले कारण संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा. यदाकदाचित अर्ज मंजुर केलेस प्रतिवादी क्र.१ ने वादीस रक्कम रुपये २५००/– कॉस्ट देणेचा हुकूम करावा, असे कथन केले आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ यांना नि.२८ चे दावा समन्स दि.१३.११.२०२१ रोजी मिळाले आहे. तसेच प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दि.२६.०७.२०२२ रोजी केला आहे. प्रतिवादी यांनी समन्सची बजावणी झाल्यापासून किमान ९० दिवसांचे आत कैफीयत देणे आवश्यक होते. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादीचे कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. असे दिसून येते की, प्रस्तुतची कैफियत विलंब माफ करुन अभिलेखावर घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांनी सदर अर्जासोबत कैफियत दाखल केली आहे. परंतु, प्रतिवादी यांचे असे वर्तुणुकीमुळे प्रस्तुतचा

दावा काम लांबणीवर पडले असल्याने सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज रक्कम रुपये ३००/– (रक्कम रुपये तीनशे फक्त) खर्च वादी यांना देणेचे अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द झालेला दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो. तसेच, कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची पुर्तता केल्यानंतर त्यांनी दाखल केलेल्या कैफियतीला पुढील निशाणी देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2022.07.29 15:23:34 +0530

ठिकाण : पाटण,जि.सातारा. ( सी.वाय.नेवारे )
दिनांक : २६.०७.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.